पुणे शहर पोलीस

# दर्पण

## डिसेंबर २०१९

# अभिप्राय...

प्रती,
मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मुंढवा पोलीस ठाणे ,पुणे शहर.
यांना सविनय सादर

**रिपोर्ट** :- पी.एस.भोसले, पो.ना.४४, मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

**विषय** :- दर्पण पुस्तकाबाबत...

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी मुंढवा पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्य करीत असताना नागरीक आपले विविध तक्रारी घेऊन पोलीस ठाणे येथे येत असतात. ठाणे अंमलदार कक्षात नागरीक बसलेले असताना तेथे ठेवण्यात आलेले दर्पण पुस्तक घेऊन ते त्यामधील पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत वाचुन पोलीसांचे कौतुक व समाधान व्यक्त करीत असतात. पुणे पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाची माहिती दर्पण पुस्तकामुळे नागरीकांस मिळते त्याबाबत नागरीकांनी कौतुक व समाधान व्यक्त केल्यामुळे आम्हास चांगले काम करण्याची स्फुर्ती मिळते.

मा.सादर व्हावे.
ता.१८/०६/२०१९

[signature]
पी.एस.भोसले
पोलीस नाईक ४४
मुंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

---

दि-१८/०६/२०१९

नाव- [illegible]

विषय-: दर्पण पुस्तिका २०१८ बाबत अभिप्राय...

महोदय,

मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी

[illegible]

[illegible]

# लोकाभिमुख उपक्रम

लोकाभिमुख उपक्रम

# Pune cops' SEVA must be replicated: RTS chief

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com




**APPLAUDING THE INITIATIVE:** Right to Services Chief Commissioner Swadheen Kshatriya (C) hands over an appreciation certificate to Constable Pooja Bhagat (L) of SEVA office in the city recently.

**PUNE:** Former Chief Secretary of Maharashtra Swadheen Kshatriya, who is State's Right to Services (RTS) Chief Commissioner, on Tuesday appreciated Pune City Police's Service Excellence and Victim Assistance (SEVA) facility, and said that he will recommend to the State government to replicate this facility across all government offices in Maharashtra.

Under SEVA, feedback of citizens is taken about services provided by the police stations in Pune.

Kshatriya inaugurated the SEVA office at the Police Commissioner's office in Camp on Tuesday. SEVA is the brainchild of Police Commissioner Dr K Venktesham who started the initiative from September 1, 2018.

DCP (Crime) Bachchan Singh explained about the journey of SEVA from the beginning, the working system, feedback mechanism, etc.

A live demonstration was also presented during the inauguration.

# प्रभागात सुरक्षेसाठी बसविले सीसीटीव्ही

कोंढवा : वार्ताहर

पुण्याचे पोलिस आयुक्त के. वेंकटेशम यांच्या पुढाकारातून 'सी चॉप' ही प्रणाली विकसित करण्यात येत असून यामध्ये प्रत्येक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास आवाहन केले जात आहे. नगरसेवक भानगिरे यांनी यासाठी प्रभागात पुढाकार घेतला असून इतर नगरसेवकांनीही आपल्या प्रभागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यास महिला व नागरिकांच्या सुरक्षेसाठी त्याचा मोठा फायदा होईल, असे प्रतिपादन वानवडी ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील यांनी केले.

काळेपडळ प्रभाग क्रमांक २६ मध्ये नगरसेवक भानगिरे यांच्या स्वखर्चातून सीरम फाटे चौक, म्हसोबा मंदिर चौक, समृद्धी सोसायटी, नेहरू पार्क या ठिकाणी अत्याधुनिक दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्याचा लोकार्पण सोहळा प्रभागातील स्थानिक महिला व विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील यांनी नगरसेवकांच्या या कामगिरीचे कौतुक करून परिसरातील सुरक्षिततेसाठी सर्वांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहन केले.

या वेळी नगरसेवक नाना भानगिरे म्हणाले, प्रभागातील नागरिकांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. हैदराबादमध्ये घडलेली घटना दुर्दैवी असून महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी आम्ही रात्रीच्या वेळी स्वखर्चाने वाहन उपलब्ध करून देणार आहोत. तसेच या परिसरातील वाढती लोकसंख्या व गुन्हेगारी लक्षात घेता प्रशासनाकडे पाठपुरावा करून येथे चौकी सुरू करण्यास आग्रह धरणार असल्याचेही नगरसेवक भानगिरे यांनी सांगितले.

या प्रसंगी अभिमन्यू भानगिरे, अश्विनी सूर्यवंशी, नाना सरवडे, प्रवीण हिल्गे, योगेश सूर्यवंशी, भगवत कदू, राहुल भुजबळ, राहुल काळे, शुभम बेंड, हनु जाधव, गोविंद सूर्यवंशी, नागेश सूर्यवंशी, मीरा वाघर, मीना येवले यांच्यासह महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या उद्‌घाटनप्रसंगी वरिष्ठ पोलिस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील, नगरसेवक प्रमोद भानगिरे व इतर.



# Police to keep vigil inside PMPML buses

**After several cases of thefts, teams of two constables have been boarding buses in civil dress; many miscreants nabbed**

Supriya.Dedgaonkar
@timesgroup.com
TWEET @supriya_mirror

Miscreants are known to take advantage of the crowded public transport to indulge in pickpocketing and snatching of items like chains and other valuable objects, making it imperative to have a strict guard on daily basis. The crime branch is now actively working on working through these issues by deploying a special squad on the buses. Its members will travel in civil dress.

A few incidents of robbery and molestation on Pune Mahanagar Parivahan Mahamandal Limited (PMPML) buses came to light a few days ago, complaints of which were made to the crime branch. These grievances prompted the officials to assemble several teams of two constables, who will take the buses in the morning and the evening to keep a check on the activities.

Additional commissioner (crime) Ashok Morale told Mirror, "In the past few days, multiple robberies have taken place inside PMPML buses. I thought it would be best to deploy a flying squad in these buses. We have made a team of two constables and they will dedicate their time in keeping an eye on the criminal activities inside the vehicles."

Within a few weeks, the crime branch was able to spot a few cases. These miscreants were nabbed and brought to the nearest police stations. "This, to some extent has inculcated fear. I hope these offenders will keep away," Morale added.

Ajay Chandhankar, PMPML's joint managing director, told Mirror that he has also received complaints of theft. He deems it fit for cops to take up the issues. "We have also alerted the driver and conductor to keep an eye and immediately call the police if they come across any such cases or find someone suspicious," he said.



The cops have been keeping a vigil since last week

प्रभात – दि. १९ डिसेंबर, २०१९

# पोलीस ठाण्यांचे होणार रँकिंग



## टॉप टेन पोलीस ठाण्यांची यादी होणार जाहीर

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १८ -** शहरातील पोलीस ठाण्यांना आता रँकिंग (श्रेणी) दिली जाणार आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने नुकतीचे देशपातळीवरील पोलीस ठाण्यांची माहिती घेऊन टॉप टेन पोलीस ठाण्यांची यादी जाहीर केली होती. त्या धर्तीवर पुणे पोलीसही हा उपक्रम राबवणार आहेत. येत्या दोन दिवसांत शहरातील ३० पैकी टॉप टेन पोलीस ठाण्यांची यादी जाहीर करण्यात येणार आहे.

पोलीस ठाण्यांना रँकिंग देताना सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वसामान्य नागरिक आणि तक्रारदारांचा फीडबॅक जाणून घेण्यात येणार आहे. यामध्ये गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी केलेले प्रयत्न, गुन्ह्यांची संख्या- वर्गवारी, तपास आणि सोडवलेल्या केसेस, गुन्ह्यांचा तपास, कम्युनिटी पोलिसिंग, कायदा सुव्यवस्था आणि पोलीस ठाण्यातील पायाभूत सुविधा याचा अभ्यास करण्यात आला आहे.

या अभ्यासानुसार पोलीस ठाण्यांना रँकिंग देण्यात आले आहे. यातील टॉप टेन पोलीस ठाण्यांची यादी दोनच दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे. तर रँकिंगमध्ये सर्वात मागे असलेल्या पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कामकाज सुधारण्यासाठी योग्य ती पावले उचलण्याचे आदेश देण्यात येणार आहेत. दरम्यान, यावर आता पुढील कार्यवाही कधी होते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पुढारी – दि. २८ डिसेंबर, २०१९

# पहिले आयएसओ मानांकन परिमंडळ पाचला

## तत्कालीन पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी हाती घेतला होता उपक्रम




तत्कालीन पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्यासह पोलिस ठाण्याचे अधिकारी.

> “दैनंदिन कामकाजाच्या निमित्ताने पोलिस स्टेशनला भेटी देत असताना अनेक प्रकारच्या कमतरता दिसत होत्या. अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांच्या कामात सूत्रबद्धता दिसून येत नव्हती. त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करून पोलिस ठाण्यातील भौतिक सुविधेसह कर्मचाऱ्यांचा गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. यामध्ये तत्कालीन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. पुण्यातील आयएसओ मानांकनप्राप्त परिमंडळ होण्याचा मान पाचला मिळाला आहे. यामुळे सर्वांनी केलेल्या कामाचा आनंद आहे.
>
> - **प्रकाश गायकवाड,** पोलिस अधीक्षक सीआयडी, पुणे

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे शहर पोलिस आयुक्तालयातील परिमंडळामध्ये ‘आयएसओ ९००१ : २०१५’ मानांकन मिळविण्याचा पहिला मान परिमंडळ पाचला मिळला आहे. परिमंडळ पाचमध्ये मुंढवा, बिबवेवाडी, मार्केट यार्ड, कोंढवा, हडपसर, वानवडी या पोलिस ठाण्यांसह सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालयाचा समावेश होतो. या सर्व पोलिस ठाण्यांचा स्मार्ट व आयएसओ मानांकनामध्ये समावेश करण्यात आला आहे. परिमंडळ पाचचे तत्कालीन पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी सर्व पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा उपक्रम हाती घेतला होता.

१५ ऑगस्ट २०१८ रोजी पुणे पोलिस आयुक्तालयाची पुर्नरचना करून परिमंडळ पाच ची निर्मिती करण्यात आली.

सर्वात महत्वाचे म्हणजे मानांकन प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये सातत्य रहावे यासाठी पुढील तीन वर्ष सर्व पोलिस ठाण्यांची तपासणी होणार आहे.

पोलिस ठाण्याला आयएसओ मानांकन प्रदान करत असताना पोलिस कर्मचाऱ्यांचा टापटीपपणा व एकसारखा पोषाख, पोलिस ठाण्याची रंगरंगोटी आणि सुव्यवस्थीतपणा, तक्रारदारांसाठी स्वागत कक्ष व चांगली वागणुक, अभिलेखाची वर्षनिहाय मांडणी व निर्लेखन, गुन्हे व मुद्देमाल निर्गती, गुन्ह्यांच्या ठिकाणास विनाविलंब भेट व कारवाई, अभ्यागतांचे अनुभव आणि प्रतिक्रीया अशा अनेक बाबींचा विचार केला जातो. यासाठी सहाय्यक पोलिस आयुक्त मिलिंद पाटील, पोलिस निरीक्षक अजित लकडे, मुरलीधर करपे, दुर्यधन पवार, संभाजी निंबाळकर, मिलिंद गायकवाड अनिल पाटील, सुनिल तांबे, रघुनाथ जाधव, सयाजी गवारे, क्रांतिकुमार पाटील यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

# Pune police visit schools to bond with students

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** In an initiative to attract young minds and bridge the gap between police and students, the Pune city police have started a weekly ceremonial parade in school campuses. On Friday morning, parades were organised at St Joseph's Convent Girls School in Khadki and St Anthony High School in Camp.

Senior police officers led by zonal Deputy Commissioners of Police (DCP) were present along with teachers of the schools. The students interacted with the police personnel and also took selfies with them. They were informed about the functioning of the police department. Officials said the initiative will help them wean students away from crime and also build confidence in them.



**HOW IT WORKS?** A woman constable talks about weapons with students on Friday.

A team of about 150 police personnel led by DCP (Zone 2) Shirish Sardeshpande participated in the parade at St Anthony High School, Solapur Bazar, in Camp, where students of Utkarsh English Medium School were also present. DCP Sardeshpande guided students about the police department and various initiatives. There were about 1,200 students present.

At St Joseph's Convent Girls School in Khadki, DCP (Zone 4) Prasad Akkanouru and his team were present for the parade. A total of 115 police personnel interacted with about 2,500 students.

Speaking to Sakal Times, Commissioner of Police Venkatesham said, "Parade reflects discipline and teamwork. Discipline ensures freedom. Parade in school also offers an opportunity for children to interact with police personnel and understand the systems (department). Better understanding leads to better citizenship."

He also tweeted that there was an exciting response from students at the parade ceremonies.

**CONTACT DETAILS**

Interested schools or colleges can contact on 8975283100 for organising police parade, appealed police.

केसरी – दि. १७ डिसेंबर, २०१९

# पोलीस दलाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी शाळांमध्ये कवायत

**पुणे** : पोलीस गणवेशाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करणे, पोलीस सुरक्षिततेसाठी आहेत ही भावना रूजवणे, उद्याची पिढी गुन्हेगारीपासून दूर ठेवणे आदी विविध उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून पुणे पोलिसांनी शहरातील शाळांमध्ये परिमंडळीय समारंभ कवायतींचे आयोजन केले होते. खडकी येथील सेंट जोसेफ गर्ल्स हायस्कूल व लष्कर येथील सेंट ॲन्थोनी हायस्कूलमध्ये या कवायतींचे आयोजन केले होते.



सेंट जोसेफ गर्ल्स हायस्कूलमध्ये शुक्रवारी सकाळी साडेसात वाजता कवायत सुरू झाली. पोलीस उपायुक्त प्रसाद अक्कानवरू यांनी कवायतीची मानवंदना स्वीकारली. येरवडा विभागाचे सहायक आयुक्त, ६ पोलिस निरीक्षक, ९ उपनिरीक्षक व सहायक निरीक्षक, ८८ कर्मचारी व १२ बॅण्ड पथकाचे पोलीस या कवायत समारंभामध्ये सहभागी होते. लष्कर येथील सेंट ॲन्थोनी स्कूलमध्ये परिमंडळ दोनचे उपायुक्त शिरीष सरदेशपांडे यांनी कवायतीची मानवंदना स्वीकारली. सहायक आयुक्त रवींद्र रसाळ यांनी कवायत कमांडर म्हणून तर, गोटमवाड यांनी द्वितीय कवायत कमांडर म्हणून काम पाहिले.



येरवडा येथील मोझे प्रशालेत संचलनावेळी सलामी देताना पोलिस.

# मोझे प्रशालेत पोलिसांचे संचलन

येरवडा : वार्ताहर

येथील नेताजी संचालनाच मोझे प्रशालेत विद्यार्थ्यांच्या अंगी शिस्त, सक्षमीकरण, नम्रता व गुणांचा विकास व्हावा या उद्देशाने पोलिस परिमंडळ चारच्या वतीने पोलिस परेड संचलनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये परिमंडळ चारच्या अंतर्गत येणाऱ्या खडकी, येरवडा, चतु:शृंगी, चंदननगर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक व पोलिस कर्मचारी सहभागी झाले होते.

बँड पथकाच्या तालावर जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा या महाराष्ट्र गीताच्या तालावर पोलिस अधिकाऱ्यांची शिस्तबद्ध परेड पाहून विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक हरखून गेले. आपल्या संपूर्ण आयुष्यात शिस्त, सक्षमीकरण, जागरूकता, दक्षता हे गुण कायमस्वरूपी निर्माण व्हावेत, तसा संदेश अंगी बाळगून उच्चपदस्थ अधिकारी होण्याची प्रेरणा मिळावी, तसेच आपणही देशाची सेवा करण्यासाठी प्रोत्साहित व्हावे असे पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

त्याप्रसंगी खडकी विभागाचे सहायक पोलिस आयुक्त बोराटे, येरवडा ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक युनूस शेख, विमानतळ ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गजानन पवार, चंदननगर ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संपतराव शहके, खडकी ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक धनाजी मिसाळ, चतु:शृंगी ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल शेवाळे, आणि परिमंडळ ४ परिसरातील १२० पोलिस कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रशालेतील सर्व शिक्षक व येरवडा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अजय वाघमारे, अनिल मगदूम आणि विनोद लवांडे यांनी केले.



# Deccan police to educate citizens on cyber fraud

**A database has been compiled on different types of modus operandi**

Archana More
@timesgroup.com
TWEET@Archana_Mirror

Cops at Deccan police station, covering a huge part of the city within its jurisdiction, have come out with a unique initiative to control cybercrime — raising awareness among citizens about this new-age fraud.

With his colleagues at Deccan police station, Deepak Lagad, senior police inspector and the brain behind the project, has prepared a database of different modus operandi used by criminals to con people. The next step is to visit colleges, schools and around 400 residential societies within their jurisdiction. At least 13 colleges, 16 schools and over 40 banks come under the police station.

Since January this year, the Deccan police have received over hundreds of cybercrime complaints, including matrimonial frauds, online marketplace cheating, online payment platform cheating, dating app cheating among others. Most of the complaints have been filed by senior citizens and youths, those who are in search of jobs. Senior citizens were usually cheated over insurance policies by asking them to deposit cash. These all victims are highly educated and tech-savy but even they could not realise that they were conned.

Elaborating the initiative, Lagad told Mirror, "Victimisation of cybercrime is significantly higher than 'conventional' crimes. Every alternate day, we have been receiving a complaint about online fraud and surprisingly educated people and college students are falling prey to the conmen. Investigation into such crime is challenging and different than other traditional crimes. These crimes can be prevented by creating awareness among people. We will explain citizens different types of modus operandi being used by the criminals so that people remember the stories and they don't commit the same mistake. There are multiple crimes in which the fraudsters have used the same trick but people are not even aware of that."



Senior police inspector Deepak Lagad

Since the banks play very important role in prevention of cybercrime, the cops have approached bank officials and conducted meetings. "Many a time, banks prefer to send instructions in writing but people don't find time to read all the papers. If the banks appoint their representatives for issuing verbal instructions, then people will not forget. Credit card frauds are on the rise and it is very challenging to detect the criminals. We have suggested the bank officials that they should take care while issuing debit and credit cards to the account holders," said Lagad.

Vinit Senwal, a yoga instructor who fell victim to an online payment platform, told Mirror, "I had received a call from an unknown number and I lost Rs 5,000 after receiving it. I did not even realise what happened with my online payment account."

Another victim, Ashutosh Dighe, who filed a complaint on Monday, said, "I received call from a private bank, asking me if I had done any transactions on my credit card. I told them that I did not make any transaction but I was told Rs 71,455 was debited from my credit card. I was shocked to know the same, as I did not even receive a single message from the bank."

महाराष्ट्र टाइम्स – दि. २६ डिसेंबर, २०१९

# प्राणांतिक अपघातांना 'ब्रेक'


**गेल्या वर्षीच्या तुलनेत अपघात ४० टक्क्यांनी घटले**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहरातील प्राणांतिक अपघातांच्या संख्येत यंदाच्या वर्षात गेल्या वर्षाच्या तुलनेत जवळपास ४० टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे प्राणांतिक अपघातांची संख्या ५० टक्क्यांनी घटविण्याच्या उद्दिष्टाच्या जवळपास पुणे पोलिस पोहोचले आहेत.

देशातील वाढते प्राणांतिक अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ता सुरक्षा समितीने दिला होता. त्यानंतर शहर पोलिसांनी अपघात रोखण्यासाठी वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या होत्या. 'शहरातील 'ब्लॅक स्पॉट' निश्चित करून, त्या ठिकाणी महापालिकेकडे पाठपुरावा केला. त्यांच्या माध्यमातून उपाययोजना केल्या. काही ठिकाणी वाहतुकीत बदल केला; तसेच, महत्त्वाचे म्हणजे दुचाकीचालकांना हेल्मेट वापरासाठी प्रोत्साहन दिले. त्याचा सकारात्मक परिणाम शहरात दिसून येत आहे,' असे मत वाहतूक शाखेतील अधिकारी व्यक्त करत आहेत.

### पोलिस आयुक्तांनी 'तो' शब्द पाळला



या वर्षात जानेवारी महिन्यात ४८ टक्क्यांनी प्राणांतिक अपघात घटले होते. त्या पार्श्वभूमीवर येत्या काळात हे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा खाली आणून अपघात रोखण्याचा एक 'पुणे पॅटर्न विकसित करून, राज्यासमोर ठेवायचा आहे,' असे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी फेब्रुवारी २०१९मध्ये एका जाहीर कार्यक्रमात सांगितले होते. नुकतेच पोलिस महासंचालक सुबोध जयस्वाल एका कार्यक्रमानिमित्त पुण्यात आले होते. त्या वेळी त्यांनी पुणे पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक केले. अपघात रोखण्याचा हा पुणे पॅटर्न राज्यासमोर ठेवणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. त्यामुळे डॉ. के. व्यंकटेशम यांनी बोललेला 'तो' शब्द खरा करून दाखविल्याची चर्चा पोलिस दलात आहे.

> शहरातील रस्ते अपघातांना रोखण्यात पोलिस दलाला बऱ्यापैकी यश आले आहे. मात्र, आमचे उद्दिष्ट प्राणांतिक अपघात ५० टक्क्यांनी कमी करणे हे आहे.
>
> – डॉ. के. व्यंकटेशम, पोलिस आयुक्त, पुणे

### गेल्या काही वर्षांतील अपघातांचा लेखाजोखा

| | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ | २०१९ |
|---|---|---|---|---|---|
| प्राणांतिक अपघात | ४१९ | ३९७ | ३६० | २४० | १५३ |
| गंभीर अपघात | ५६८ | ५९५ | ६०७ | ३८९ | ३१२ |
| किरकोळ अपघात | ३६७ | ३०६ | ३५८ | १७८ | १२० |
| एकूण अपघात | १३५४ | १२९८ | १३२५ | ८०७ | ५८५ |

(२०१९ची आकडेवारी ऑक्टोबरपर्यंतची आहे.)

# जेव्हा पोलीस आयुक्त विद्यार्थिनींबरोबर घेतात भोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशभरात महिला तरुणी, अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेविषयी चिंतेचे वातावरण आहे. पालकांना आपली मुलगी घराबाहेर पडली तर वाटेत तिच्याबरोबर काही अघटित तर घडणार नाही ना, अशी शंका येते. त्यात अल्पवयीन मुलगी शिक्षणासाठी वसतिगृहात राहत असेल तर आणखीनच काळजी वाटत असते. वारजे येथील महर्षी कर्वे शिक्षण संस्थेत महिला सुरक्षेबाबत कार्यशाळा घेण्यात आली. त्यानंतर पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी मुलींप्रमाणेच हातात ताट घेऊन रांगेत आपले पदार्थ घेऊन मुलींबरोबर भोजन घेत त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. त्यांच्यासमवेत पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, पौर्णिमा गायकवाड, वारजे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम तसेच ६ महिला पोलीस अधिकारी व १० महिला पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. पुणे शहरासारख्या शहराची जबाबदारी असणारे आपल्याबरोबर बसून चक्क गप्पा मारत असल्याचे दृश्य त्यांना अचंबित करणारे होते



विद्यार्थ्यांसमवेत भोजन करताना पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम.

## मुलींनी अत्यंत सजग राहावे

- सोशल मीडियाचा वापर करताना त्यावरुन आपली माहिती, फोटो अनोळखी व्यक्तींना पाठवू नका. कारण ही माहिती कधीच डिलिट होत नाही आणि त्याचा गैरवापर होऊ शकतो. त्यामुळे मुलींनी अत्यंत सजग राहिले पाहिजे, असे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी सांगितले.
- पोलीस आयुक्तांनी महिलांच्या सुरक्षेच्या बाबतीत पोलिसांकडून कोणकोणते उपक्रम हाती घेण्यात आले आहेत याची देखील माहिती विद्यार्थिनींना दिली. त्या वेळी मुलींनी सायबर सुरक्षा यासह अन्य विषयावर प्रश्न विचारले असता त्यांच्या प्रश्नांना पोलीस आयुक्त यांच्यासह उपायुक्त स्वप्ना गोरे, पौर्णिमा गायकवाड यांनी उत्तरे दिली.
- त्यांच्या शंकांचे निरसन केले. तसेच संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी काही अडचण आल्यास त्यांनी त्वरित पोलिसांकडे तक्रार करावी. त्यांच्या तक्रारींचे निरसन केले जाईल, असे डॉ. वेंकटेशम यांनी सांगितले. गोरे यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थिनी हर्षदा गायकवाड हिने आभार मानले.

लोकसत्ता – दि.१८ डिसेंबर, २०१९

# पीएमपीमध्ये साध्या वेशातील पोलीस

## शहरातील बसथांब्यांवर चोरट्यांचा उच्छाद

**प्रतिनिधी, पुणे**

**शहरातील पीएमपी** स्थानके तसेच एसटी स्थानकांच्या परिसरात चोरट्यांनी उच्छाद मांडला आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रवाशांना लक्ष्य करून त्यांच्याकडील ऐवज लांबविणारी चोरट्यांची टोळी सक्रिय झाली आहे. या पार्श्वभूमीवर साध्या वेशातील पोलीस आता पीएमपी बसमधून प्रवास करणार आहेत. चोरट्यांना पकडण्यासाठी गर्दीचे पीएमपी थांबे तसेच स्थानकांवर गस्त घालण्यात येणार आहे.

> पीएमपीमधील प्रवाशांकडील ऐवज लांबविण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तसेच चोरट्यांना पकडण्यासाठी पोलिसांनी खास पथके तयार केली आहेत. साध्या वेशातील पोलीस बसमधून प्रवास करणार आहेत. शहरातील प्रमुख पीएमपी थांबे, स्थानके, एसटी स्थानकांच्या परिसरात गस्त घालण्याच्या सूचना गुन्हे शाखेतील कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. महिनाभरापूर्वी पोलिसांनी पीएमपी बसमध्ये चोरट्यांना पकडले होते. या टोळीत महिलांचा समावेश होता.
>
> – **अशोक मोराळे**, अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे)

शहरातील पीएमपी स्थानके तसेच एसटी स्थानकांच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून प्रवाशांकडील ऐवज लांबविण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना लक्ष्य करून चोरटे पिशवीतील दागिने आणि रोकड लांबवितात. काही घटनांमध्ये चोरट्यांकडून किरकोळ स्वरूपाच्या ऐवज लांबविण्याच्या घटना घडतात. बाहेरगावाहून आलेले प्रवासी तक्रार देण्याच्या फंदात पडत नाहीत. स्वारगेट, पुणे स्टेशन, शिवाजीनगर, हडपसर भागातील पीएमपी स्थानक परिसरात प्रवाशांकडील ऐवज लांबविण्याच्या घटना घडल्या आहेत. गेल्या दोन ते तीन महिन्यात प्रवाशांकडील ऐवज लांबविण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून गर्दीचे बसथांबे तसेच स्थानकांच्या परिसरात गस्त घालण्यात येणार आहे.

ज्या मार्गांवर प्रवाशांकडील ऐवज लांबविण्याच्या घटना घडल्या आहेत अशा मार्गांवरील पीएमपीमधून साध्या वेशातील पोलीस प्रवास करणार आहेत. पोलिसांनी पीएमपी बसथांबे तसेच एसटी स्थानकांच्या परिसरातील चोऱ्या रोखण्यासाठी उपाययोजना केल्या असून चोरट्यांना पकडण्यासाठी खास पथके तयार केली आहेत.

स्वारगेट ते धनकवडी या मार्गावर पीएमपी बसने प्रवास करणाऱ्या महिलेच्या पिशवीतील १ लाख १५ हजारांचे दागिने चोरट्यांनी लांबविल्याची घटना घडली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पीएमपी प्रवासी महिलेच्या हातातील ७५ हजारांची सोन्याची बांगडी चोरट्यांनी लांबविल्याची घटना उघडकीस आली. आठवडाभरात पीएमपी प्रवासी महिलांकडील ऐवज लांबविण्याच्या पाच घटना घडल्या.

लोकसत्ता – दि.२० डिसेंबर, २०१९

# वाहतूक पोलिसांना आता पोलिसांचे साहाय्य

## वाहतूक समस्या सोडविण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांची मदत

प्रतिनिधी, पुणे

शहरातील वाहतूक समस्या दिवसेंदिवस जटील होत आहे. वाहतूक कोंडी सोडवण्याची तसेच अन्य उपाययोजना करण्याची जबाबदारी एकटे वाहतूक पोलीस पार पाडू शकत नसल्याने आता शहरातील तीस पोलीस ठाण्यातील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे या कामात साहाय्य घेण्यात येणार आहे. प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाच वाहतूक समस्या निश्चित करण्यात येणार आहेत. अशाप्रकारे शहरातील दीडशे समस्यांचे निश्चितीकरण झाल्यानंतर या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे नियोजन आहे.

शहराचा विस्तार वाढत आहे. आयटी कर्मचारी तसेच विद्यार्थी उपनगरात मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. शहरापासून काही अंतरावर रांजणगाव एमआयडीसी, चाकण, तळेगाव, पिंपरी-चिंचवड, भोसरी ही औद्योगिक क्षेत्रे आहेत. त्यामुळे या ठिकाणी नोकरी करत असलेले अनेकजण शहरातील उपनगरात वास्तव्य करण्यास प्राधान्य देत आहेत. वाहनांची वाढती संख्या आणि रस्त्यांची रुंदी यामुळे शहर परिसरातील अनेक रस्त्यांवर दररोज सकाळी आणि सायंकाळी मोठ्या प्रमाणावर कोंडी होते. काही भागात रस्त्यांची रुंदी कमी असल्याचे, पदपथ उपलब्ध नसल्याचे, वाहनतळांचा वापर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी शहरातील ३० पोलीस ठाण्यातील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात येणार आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यातील पाच समस्या ठरवून त्यावर आवश्यक उपाययोजना केल्या जातील. पोलिसांव्यतिरिक्त संबंधित यंत्रणांची मदत घेतली जाणार आहे तसेच समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावाही केला जाणार आहे. ३० पोलीस ठाण्यातील १५० समस्या विचारात घेऊन त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती वाहतूक पोलिसांकडून देण्यात आली.

### वाहतूक पर्यवेक्षकाची नेमणूक

शहरातील ३० पोलीस ठाण्यातील प्रत्येकी पाच समस्या सोडविण्यासाठी आणि या कामात सुसूत्रता आणण्यासाठी अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय शिंदे यांची नेमणूक करण्यात आली आहे. अतिरिक्त आयुक्त पर्यवेक्षक आणि नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील. दरम्यान, परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त प्रसाद अक्कानवरु यांची वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांची बदली करण्यात आली असून त्यांची नेमणूक परिमंडळ चारच्या पोलीस उपायुक्तपदी करण्यात आली आहे.

# ‘सेवा प्रणाली उपक्रम राज्यभरात सुरू करावा’

## पोलिस आयुक्तालयात सेवा प्रणाली कार्यालयाचे उद्घाटन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

‘पुणे पोलिसांनी सुरू केलेला सेवा प्रणाली (सर्व्हिस एक्सलन्स व्हिक्टीम असिस्टन्स) हा उपक्रम लोकाभिमुख असून त्याचा नागरिकांना खूप चांगला फायदा होत आहे. त्यामुळे राज्यभरात हा उपक्रम राबविण्यासाठी सरकारला शिफारस करणार आहे,’ अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रिय यांनी मंगळवारी दिली.

पुणे पोलिस आयुक्तालयात सेवा प्रणाली उपक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या कार्यालयाचे उद्घाटन क्षत्रिय यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. याप्रसंगी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, उपायुक्त संभाजी कदम व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



सेवा प्रणाली कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी स्वाधीन क्षत्रिय.

क्षत्रिय म्हणाले, ‘पुणे पोलिसांनी सुरू केलेल्या सेवा उपक्रमामुळे लोकाभिमुख प्रशासन पहायला मिळाले आहे. नागरिकांना केंद्रबिंदू ठेवून सुरू केलेला उपक्रम पोलिसांच्या सांघिक कामगिरीमुळे यशस्वी झाला आहे. पारदर्शकता खूप महत्त्वाची असून सेवा प्रणालीमुळे हा उद्देश सफल झाला आहे. राज्यभरात वेगवेगळ्या प्रकारचे ३९ शासकीय विभाग असून त्या ठिकाणी या उपक्रमाची माहिती देण्यास प्राधान्य दिले जाईल; तसेच हा उपक्रम राज्यव्यापी करण्यासाठी लोकसेवा हक्क आयोगाच्या वतीने शासनाला शिफारस करण्यात येणार आहे.’ लोकसेवा हक्क कायदा २०१५ मध्ये ज्या गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत, त्यामधील सर्व गोष्टी सेवा प्रणालीमध्ये पाळल्या जात आहेत. त्यामुळे नागरिकांना खूप फायदा होत असल्याचे दिसून आहे. सेवा हक्क कायद्याची माहिती असणारे सूचना फलक पोलिसांनी प्रत्येक पोलिस ठाण्यात लावावेत, अशी सूचना क्षत्रिय यांनी केली.

डॉ. शिसवे म्हणाले की, लोकांच्या प्रतिसादानंतर प्रणालीद्वारे आणखी बदल घडविण्यासंदर्भात प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांची जबाबदारी वाढली आहे.’ या वेळी सेवा प्रणालीचा अनुभव काही नागरिकांनी सांगितला.

### इमारतीत कामांमुळे गैरसोय

आयुक्तालय इमारतीत नवीन बदल होत असल्याने मंगळवारी ‘सेवा’ कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्यासाठी येणाऱ्यांची गैरसोय झाली. तिसऱ्या मजल्यावरील सभागृहाच्या प्रवेशद्वाराबाहेर फरशा बसविणे, भिंत उभारणी तसेच अन्य कामे सुरू होती. बांधकामाच्या राडारोड्यातून वाट काढत नागरिक या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले. वेल्डिंगचे काम सुरू असल्यामुळे काही जणांनी अधिकाऱ्यांसाठी असलेल्या जिन्यातून जाण्याचा प्रयत्न केला. पण, त्यांना त्या मार्गाने जाऊ दिले नाही.

लोकमत – दि. ३ डिसेंबर, २०१९

# शहर पोलीस करणार चिंतामुक्त ड्यूटी

## मुलांची काळजी नाही : पोलीस कर्मचाऱ्यांसाठी डे केअर सेंटर सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : ड्यूटीच्या वेळा अनियमित शिवाय त्या कधी कधी १२ तासांहून अधिक काळ, सणाला बंदोबस्त असतो तो वेगळाच अशा वेळी इतर पाळणाघरमध्ये सोय होत नसल्याने अनेक पोलीस कर्मचाऱ्यांचे ड्यूटी करीत असताना सर्व लक्ष आपल्या लहानग्यांकडे लागले असते. पण आता त्यांची ही चिंता दूर झाली आहे. आपल्या लहानग्यांची चिंता न करता पोलीस कर्मचारी आपली ड्यूटी बजावू शकणार आहे. कारण शहर पोलीस दलाच्यावतीने पोलीस कर्मचाऱ्यांच्या लहान मुलांसाठी डे केअर सेंटर सुरू करण्यात आले आहे. अत्याधुनिक सोयी-सुविधा असलेले हे डे केअर सेंटर शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालय व समर्थ पोलीस लाईन अशा दोन ठिकाणी हे डे केअर सेंटर सुरू केले आहे.



शिवाजीनगर येथील डे केअर सेंटर.

भातुकली संस्थेमार्फत डे केअरचे व्यवस्थापन पाहण्यात येत आहे. येथे पोलीस कर्मचारी आपल्या ६ महिन्यांच्या बाळापासून १० वर्षापर्यंतच्या मुलाला ठेवू शकतात. तेथे वेगवेगळी खेळणी, झोपाळे, चित्रकलेपासून अनेक कला शिकण्यासाठीचे साहित्य, झोपण्यासाठी छोटे पलंग ठेवले आहेत. संस्थेच्या वैशाली गलांडे यांनी सांगितले, की शिवाजीनगर पोलीस मुख्यालय आणि समर्थ पोलीस लाईन अशा दोन ठिकाणी ही पाळणाघरे सुरु केली आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा वेगळ्या असतात. त्यामुळे इतर पाळणाघरे सायंकाळी बंद होतात. पण अनेकदा पोलिसांना उशिरापर्यंत ड्यूटी करावी लागते. त्यामुळे त्यांचे सर्व लक्ष आपल्या बाळाकडे लागलेले असते. त्यामुळे हे पाळणाघर सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत असणार आहे. या ठिकाणी पोलीस कर्मचारी आपल्या पाल्याला सकाळी आणून सोडतात. काही मुले येथूनच सकाळी ११ वाजता शाळेत जातात, तर काही पालक सकाळी मुलांना शाळेत सोडतात, ती मुले शाळेतून या पाळणाघरात येतात. या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी ५० मुलांची सोय करण्यात आली आहे.

> शहरातील पाळणाघरे रविवारी बंद असतात. पण पोलिसांना रविवारीही ड्यूटी असल्याने हे पाळणाघर रविवारीही सुरु ठेवावे, अशी पोलीस कर्मचाऱ्यांची मागणी आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहे. याशिवाय दिवाळी, गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक अशा सणाच्या दिवशी अन्य पाळणाघरे बंद असतात. मात्र, तेव्हा पोलीस कर्मचाऱ्यांना अधिक काळ ड्यूटी असते. अशा वेळी हे पाळणाघर सुरु ठेवण्याचा विचार करण्यात येणार आहे.

# अवैध धंद्यांची यादी पोलीस वेबसाइटवर जाहीर

## संपूर्ण शहर परिसर : अवैध धंदे सुरु असल्याची माहिती नागरिकांनी १०० क्रमांकावर द्यावी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : शहरात विविध ठिकाणी अवैध धंदे राजरोजपणे सुरु असतात. जुगार, मटका, गावठी दारुची विक्री, अमली पदार्थ विक्री अशा अवैध धंद्यांवर पोलिसांनी यापूर्वी जेथे जेथे धाडी टाकून कारवाई केली. त्याची यादी शहर पोलीस दलाच्या वेबसाईटवर बुधवारी जाहीर केली आहे.

'लोकमत'ने यासंबंधी 'नागरिकांनीच ठेवावा आता अवैध धंद्यांवर वॉच' असे वृत्त बुधवारच्या अंकात प्रसिद्ध केले होते. पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी याबाबतची घोषणा केली होती. मात्र, अद्याप अशी यादी अजून वेबसाईटवर प्रसिद्ध झाली नसल्याचे 'लोकमत'ने निदर्शनास आणून दिले होते. त्याची तातडीने दखल घेऊन पोलीस आयुक्तांनी ही यादी वेबसाईटवर टाकण्याचे आदेश दिले होते. त्यांच्या आदेशानुसार ही यादी आज जाहीर केली आहे.

आपल्या भागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, अवैध धंदे बंद व्हावेत, यासाठी नागरिकांनी पुढे येऊन पोलिसांना माहिती द्यावी, यासाठी शहरात कोठे कोठे असे धंदे सुरु असतात, याची यादी टाकली आहे.

अवैध धंदे सुरु असल्याची माहिती १०० क्रमांकावर नागरिकांनी दिली तर त्यांना त्यांचे नाव सांगण्याची आवश्यकता नाही.

### समर्थ, खडक व विश्रामबाग पोलीस ठाण्यात सर्वाधिक कारवाया

1 या यादीत परिमंडळानुसार प्रत्येक पोलीस ठाण्याच्या अंतर्गत कोणत्या ठिकाणी कोणत्या प्रकारची यापूर्वी कारवाई झाली याची माहिती देण्यात आली आहे. त्यात शहरातील मध्य वस्तीमधील विश्रामबाग पोलीस ठाणे ५०, खडक पोलीस ठाणे ५०, समर्थ पोलीस ठाणे ५० या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सर्वाधिक कारवाया झाल्याचे दिसून येत आहे.

2 सिंहगड रोड ४०, वारजे ३९, शिवाजीनगर ४३, सहकारनगर ३७, स्वारगेट ३४, बिबवेवाडी २९, मार्केट यार्ड ३६, लष्कर २८, खडकी १६, चंदननगर ११, चतु:शृंगी २२, विश्रांतवाडी १५ ठिकाणी कारवाया यापूर्वी झाल्या होत्या. सर्वात कमी विमानतळ पोलीस ठाण्याच्या अंतर्गत फक्त ३ ठिकाणी कारवाया झाल्याचे या यादीवरुन दिसून येत आहे.



नागरिकांनीच ठेवावा आता अवैध धंद्यांवर 'वॉच'

आज का आनंद – दि. २८ डिसेंबर, २०१९



# पुलिस परिमंडल-5 को आईएसओ 9001 : 2015 प्रमाणपत्र

## सभी 6 पुलिस स्टेशन और सहायक आयुक्त कार्यालय 'स्मार्ट' बने

**पुणे, 27 दिसंबर (आ.प्र.)**

पुणे शहर पुलिस आयुक्तालय के तहत आने वाले पुलिस उपायुक्त परिमंडल-5 को आईएसओ 9001:2005 प्रमाण-पत्र दिया गया.

इस परिमंडल के तहत आने वाले सभी छह पुलिस स्टेशन और सहायक पुलिस आयुक्त कार्यालय को 'स्मार्ट' प्रमाणपत्र दिया गया. इस परिमंडल के सभी पुलिस स्टेशनों के पुलिस निरीक्षकों और सहायक पुलिस आयुक्त (एसीपी) की कड़ी मेहनत से यह प्रमाणपत्र हासिल हुआ. इस परिमंडल में आने वाले पुलिस स्टेशनों में निम्न बदलाव किए गए. पुलिस कर्मचारियों की एक जैसी यूनिफार्म, पुलिस स्टेशनों का रंगरोगन और सुव्यवस्थित तरीके से संचालन, शिकायतकर्ताओं के लिए स्वागत कक्ष और अच्छा व्यवहार, दस्तावेजों को सुव्यवस्थित तरीके से रखा जाना, क्राइम और बरामद माल का डिस्पोजल, घटनास्थल पर बिना देर किए पहुंचना तथा फीडबैक सिस्टम आदि पर काम किया गया. इसके लिए सहायक पुलिस आयुक्त मिलिंद पाटिल व सुनील देशमुख के साथ ही मुंढवा पुलिस स्टेशन के पुलिस निरीक्षक पाचुडकर, भोसले, विश्रांतवाड़ी पुलिस स्टेशन के पुलिस निरीक्षक अजीत लकडे व मुरलीधर करपे, मार्केटयार्ड पुलिस स्टेशन के पुलिस निरीक्षक दुर्योधन पवार, निंबालकर, कोंढवा पुलिस स्टेशन के मिलिंद गायकवाड़ और अनिल पाटिल, हड़पसर पुलिस स्टेशन के पुलिस निरीक्षक सुनील तांबे और रघुनाथ जाधव तथा वानवड़ी पुलिस स्टेशन के पीआई सवाजी गवारे व क्रांतिकुमार पाटिल ने मेहनत की.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ०१ डिसेंबर, २०१९

# खाकी वर्दीला डाग नको

## वाहतूक शाखेच्या उद्घाटनप्रसंगी पोलिस महासंचालक जयस्वाल यांनी केले आवाहन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'पोलिसांच्या अनेक कामांपैकी वाहतूक नियमन हे महत्त्वाचे काम आहे. पोलिस दलातील शिपाई हाच सर्वप्रथम नागरिकांच्या संपर्कात येतो. त्यामुळे त्यांच्यावर मोठी जबाबदारी असते. तेथे काळजीपूर्वक आणि मेहनतीने काम करावे लागते. तेथे खाकी वर्दीला डाग लागेल, असे काम करू नका,' असे आवाहन राज्याचे पोलिस महासंचालक सुबोधकुमार जयस्वाल यांनी शनिवारी केले.

येरवडा येथे नव्याने उभारलेल्या वाहतूक शाखेच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन जयस्वाल यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. विभागीय आयुक्त दीपक म्हैसेकर, अतिरिक्त पोलिस महासंचालक अतुलचंद्र कुलकर्णी, पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, वाहतूक शाखेचे उपायुक्त पंकज देशमुख यांच्यासह आजी-माजी पोलिस अधिकारी या वेळी उपस्थित होते. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे केवळ ब्रीद न राहता, ते प्रत्येक कर्मचाऱ्याच्या मनात भिनले पाहिजे. 'दीक्षान्त परेड'च्या वेळेस आपण घेतलेल्या शपथेप्रमाणे आपले काम आहे का, याचा विचार केला पाहिजे,' असे जयस्वाल यांनी सांगितले. 'जिल्ह्यात वाघोली, चाकण येथे वाहतुकीची सर्वाधिक कोंडी होते. तेथे पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी पोलिसांना आवश्यक ती सर्व मदत करण्यास आम्ही तयार आहोत,' असे म्हैसेकर म्हणाले.





नवीन वाहतूक पोलिस उपायुक्त कार्यालयात साकारण्यात आलेला नियंत्रण कक्ष. पोलिस महासंचालक सुबोधकुमार जयस्वाल यांनी तेथील अद्ययावत यंत्रणेची पाहणी केली.

### 'अपघात रोखण्यासाठी पुणे पॅटर्न'

'राज्यात दर वर्षी प्राणघातक अपघातांमध्ये १० हजार जणांचा मृत्यू होतो. अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी करण्याकडे सर्व अधिकाऱ्यांना विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. पोलिसांनी प्राणघातक अपघात कमी करण्यासाठी काम केले, यावर सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष आहे. पुण्यात प्राणघातक अपघाताचे प्रमाण कमी झाले, हे मी राज्यातील पोलिस दलाला उदाहरणासह सांगून त्यांना अपघात कमी करण्याचे टार्गेट देणार आहे,' असे जयस्वाल यांनी सांगितले.

> शहरातील वाहतुकीचा सरासरी वेग ताशी १८ किलोमीटर आहे; तसेच, सार्वजनिक वाहतुकीचे प्रमाण ५० टक्के असणे गरजेचे असताना, ते केवळ ११ टक्के आहे. यंदा १५ टक्के पदपथ कमी झाले असून, ४९ पादचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. प्राणघातक अपघातांचे प्रमाण मात्र २४ ते २८ टक्क्यांनी घटले आहे.
>
> – डॉ. के. व्यंकटेशम, पोलिस आयुक्त, पुणे

लोकमत – दि. ३० डिसेंबर, २०१९

मोठा बंदोबस्त : अवैध पार्ट्या, अमली पदार्थ तस्कर रडारवर

# नववर्षाच्या स्वागतासाठी पोलीसही झाले सज्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : देशातील तणावाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात नववर्षाचे स्वागत करताना कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनीही जय्यत तयारी केली आहे. गुन्हे शाखेच्या वतीने गेल्या दोन दिवसांपासून विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. ३१ डिसेंबरला अवैध पार्ट्या होऊ नये, तसेच अशा पार्ट्यांमध्ये अमली पदार्थांचा वापर सर्वसाधारणपणे होत असतो. त्यावर निर्बंध आणण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली १० पथके तयार करण्यात आली आहेत.

या पथकाद्वारे हॉटेल्स, पब तसेच पंचतारांकित हॉटेल्स यांची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. अनेक ठिकाणी विविध प्रकारच्या सांकेतिक भाषेत रेव्ह पार्ट्यांचे आयोजन केले जाते. त्यावर नजर ठेवण्यासाठी स्वतंत्रपणे ३ पथके नेमण्यात आली आहेत. त्यांना अमली पदार्थांच्या तस्करांवर नजर ठेवण्याच्या आदेश देण्यात आला आहे.

## उपनगरांतील पार्ट्यांवर विशेष नजर



शहराच्या उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर हॉटेल, पब सुरू झाली असून, त्यात अनेकदा अवैध धंदे चालतात. ३१ डिसेंबरच्या रात्री येथे मोठ्या पार्ट्यांचे आयोजनही केले जाते. त्यात अवैध दारू, अमली पदार्थ यांचा वापर होण्याची शक्यता असते. अशा सर्व हॉटेल्सवर पोलिसांची नजर असणार आहे. गेल्या दोन दिवसांत गुन्हे शाखेने शहरातील ८१ हॉटेल्सची तपासणी केली. त्यात हडपसरमधील पेंटहाऊस हे हॉटेल नेमून दिलेल्या वेळेपेक्षा अधिक काळ सुरू असल्याचे आढळून आल्याने या हॉटेलवर कारवाई करण्यात आली आहे.

**३१ डिसेंबर** रोजी नववर्षाचे स्वागत करताना शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. त्यात अनेकदा मद्यप्राशन करून काही जण तरुणी, महिलांना त्रास देण्याचा प्रयत्न करतात. अशा गर्दी होणाऱ्या ठिकाणी साध्या वेशातील महिला अधिकाऱ्यांची ४ पथके नेमण्यात आली आहेत. शहरातील गर्दीच्या काही प्रमुख ठिकाणी कॅम्प परिसर, कल्याणीनगर, मुंढवा, फर्ग्युसन रोड, जंगलीमहाराज रोड या भागात होणारी गर्दी पाहता पोलिसांची अतिरिक्त कुमक ठेवण्यात येणार आहे.

### तगडा बंदोबस्त

- ३१ डिसेंबरच्या रात्री शहर पोलीस दलाने तगडा बंदोबस्त ठेवला आहे. त्यात पोलीस आयुक्त आणि सह पोलीस आयुक्त हे या संपूर्ण बंदोबस्तावर देखरेख ठेवणार आहेत.
- त्यात सर्व अपर पोलीस आयुक्त, ९ पोलीस उपायुक्त, २० सहायक पोलीस आयुक्त, ३५ पोलीस निरीक्षक, १०० पोलीस उपनिरीक्षक आणि १ हजार ४०० हून अधिक पोलीस कर्मचारी यांचा बंदोबस्त असणार आहे.

या दरम्यान, मोठ्या प्रमाणावर अवैध दारूची वाहतूक केली जाते. त्याला प्रतिबंध करण्यासाठी रात्री उशिरापर्यंत नाकाबंदी करण्यात येत आहे. त्यातून संशयास्पद वाहनांची तपासणी सुरू करण्यात आली आहे.

# सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण

## प्रभाग २६ मध्ये नगरसेवक भानगिरे यांच्या स्वखर्चातून उपक्रम

**हडपसर, ता. ११ : पोलिस आयुक्त के. वेंकटेशम यांच्या पुढाकारातून सी वॉच ही प्रणाली विकसित करण्यात येत आहे. या माध्यमातून प्रत्येक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसण्यासाठी आवाहन केले जात आहे. यासाठी नगरसेवक नाना भानगिरे यांनी प्रभागात पुढाकार घेतला असून, इतर नगरसेवकांनीही आपल्या भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले, तर महिला व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी त्याचा लाभ होईल, असे प्रतिपादन वानवडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील यांनी केले.**




हडपसर : प्रभाग २६ मध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण करताना मान्यवर.

प्रभाग क्रमांक २६ मध्ये नगरसेवक भानगिरे यांच्या स्वखर्चातून श्रीराम फराटे चौक, म्हसोबा मंदिर चौक, समृद्धी सोसायटी, नेहरू पार्क या ठिकाणी अत्याधुनिक दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. याचा लोकार्पण सोहळा प्रभागातील स्थानिक महिला व विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पाटील बोलत होते.

या वेळी बोलताना भानगिरे म्हणाले, की महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी रात्रीच्या वेळी स्वखर्चातून वाहनदेखील उपलब्ध करून देणार आहोत, तसेच या परिसरातील वाढती लोकसंख्या व गुन्हेगारी लक्षात घेता स्वखर्चातून पोलिस चौकीचे बांधकाम करून देणार असून, यासाठी पोलिस प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.

याप्रसंगी अभिमन्यू भानगिरे, अश्विनी सूर्यवंशी, नाना तरवडे, प्रवीण हिलगे, योगेश सूर्यवंशी, भगवान कडू, राहुल भुजबळ, राहुल काळे, शुभम बंड, राजू जाधव, गोविंद सूर्यवंशी, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, मीरा बाबर, मीना बेंद्रे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पुढारी – दि. ०३ डिसेंबर, २०१९

# लवकरच शहरात पहिले 'चाइल्ड फ्रेंडली पोलिस ठाणे'

## लष्कर पोलिस ठाण्याच्या आवारात प्रायोगिक तत्त्वावर सुरुवात; प्रत्येक पोलिस ठाण्यात सुरू करण्याचा मानस

- विधिसंघर्षित, पीडित, वंचित मुलांसाठी ठरणार लाभदायक
- भरोसा सेल व होप फॉर द चिल्ड्रन फाउंडेशनचा पुढाकार


चाइल्ड फ्रेंडली पोलिस ठाण्याची खोली.

पुढारी विशेष

> पोलिस व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून चाइल्ड फ्रेंडली पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात आली. प्रायोगिक तत्त्वावर लष्कर पोलिस ठाण्यात या उपक्रमाला सुरुवात करण्यात येत आहे. त्यानंतर शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्यात चाइल्ड फ्रेंडली पोलिस ठाण्याची निर्मिती करण्याचा मानस आहे.
> -बच्चन सिंह, उपायुक्त पुणे शहर

पुणे: प्रतिनिधी

[illegible]

**पुढारी – दि. १८ डिसेंबर, २०१९**



वारजे येथील महिला सुरक्षा कार्यशाळेत पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांच्यासमवेत सहभागी विद्यार्थिनी.

# वारजेत महिला सुरक्षा कार्यशाळा

पुणे : प्रतिनिधी

वारजे येथील महर्षी कर्वे शिक्षण संस्थेत महिला सुरक्षेच्या संदर्भात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या वेळी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी संस्थेतील विद्यार्थिनींसोबत संवाद साधून त्यांना सुरक्षेच्या बाबतीत मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव पी. व्ही. शास्त्री, कार्याध्यक्ष प्रमोद गोरे, डॉ. एन. डी. पाटील, संचालिका विद्या देशपांडे, पोलिस उपायुक्त स्वप्ना गोरे, उपायुक्त पौर्णिमा गायकवाड, वारजे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक कदम आदी उपस्थित होते. कार्यशाळेला दोन हजार विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

पोलिस आयुक्तांनी महिलांच्या सुरक्षेच्या बाबतीत पोलिसांकडून कोणकोणते उपक्रम हाती घेण्यात आले आहेत याविषयीची माहिती विद्यार्थिनींना दिली. त्या वेळी मुलींनी मानसिक सुरक्षा याबाबत अन्य विषयांवर प्रश्न विचारले असता, त्यांच्या प्रश्नांना पोलिस आयुक्त यांच्यासह उपायुक्त स्वप्ना गोरे, पौर्णिमा गायकवाड यांनी उत्तरे दिली.

त्यांच्या शंकांचे निरसन केले. तसेच, संस्थेतील पदाधिकाऱ्यांना काही अडचण आल्यास त्यांनी त्वरित पोलिसांकडे तक्रार करावी. त्यांच्या तक्रारींचे निरसन केले जाईल, असे डॉ. वेंकटेशम यांनी सांगितले. गोरे यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थिनी हर्षदा गायकवाड हिने आभार प्रदर्शन केले.

**लोकसत्ता – दि. १७ डिसेंबर, २०१९**



एखाद्या नवीन वास्तूचे उद्घाटन पाहुणे बोलावून हस्ते करण्याची प्रथा आहे. पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी या प्रथेला छेद देत पोलीस आयुक्तालयात सुरू करण्यात आलेल्या उपाहारगृहाचे उद्घाटन करण्याचा मान पोलीस शिपाई विशाल दळवी यांना दिला. या प्रसंगी पोलीस आयुक्त डॉ. वेंकटेशम, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) वीरेंद्र मिश्र उपस्थित होते.

पुढारी – दि. ०५ डिसेंबर, २०१९

# महिला सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलिस घेणार विशेष खबरदारी

**पुणे: प्रतिनिधी**

शहरातील महिला सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तसेच इतरही गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. ज्या ठिकाणी वारंवार गुन्हे घडतात अशा ठिकाणांची यादी करून त्या ठिकाणी तत्काळ उपाययोजना करण्याबाबतच्या सूचना पोलिसांकडून महापालिकेला देण्यात आल्या आहेत. अनेकदा अंधार असलेल्या ठिकाणांचा फायदा घेत गुन्हेगार गुन्हे करतात. त्यामुळे अंधार असलेल्या ठिकाणी दिवे लावावे, भुयारी मार्गात कर्मचारी नेमावे, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

> शहरातील अंधार असलेल्या, निर्मनुष्य ठिकाणी उपाययोजना करण्याबाबत महापालिकेला कळविण्यात आले आहे. वेळोवेळी त्यांच्याशी समन्वय ठेवून उपाययोजना केल्या जात आहेत. रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढविण्यात आली. पोलिसांच्या शंभर क्रमांकावर मदत मागितल्यास सात मिनिटांत पोलिस घटनास्थळी पोहचून मदत करतात. हा वेळ यापेक्षाही अधिक कमी करण्यावर भर दिला जात आहे. नागरिक व महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य असेल.
>
> - डॉ. व्यंकटेशम, पोलिस आयुक्त

दरम्यान, हैदराबाद येथे डॉक्टर महिलेवर अत्याचार करून खून केल्याच्या घटनेनंतर महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच पुण्यातदेखील पूर्वी महिला अत्याचाराच्या व खुनाच्या घटना घडल्या आहेत. त्यावर वेळोवेळी उपायोजना करण्यात आल्या होत्या. नोकरी करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठी 'बडीकॉप' ही योजना पुण्यात सुरू करण्यात आली. त्यासाठी व्हॉट्स अॅप ग्रुप तयार करण्यात आले.

पुढारी – दि. ११ डिसेंबर, २०१९

# सेवा हक्क कायद्यामध्ये खरे काम पुणे पोलिसांचे

## स्वाधीन क्षत्रिय यांचे प्रतिपादन

पुणे : प्रतिनिधी

सेवा हक्क कायद्यामध्ये खरे काम पुणे पोलिसांचे आहे. लोकाभिमुख प्रशासन पोलिस पुणे आयुक्तालयात पाहायला मिळाले. सेवा प्रणाली राज्यात लागू करण्याबाबत शिफारस करणार असल्याचे मत राज्याचे मुख्य सेवा हक्क आयुक्त स्वाधीन क्षत्रिय यांनी व्यक्त केले. ते पोलिस आयुक्तालयातील सेवा कार्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

या वेळी पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, पोलिस उपायुक्त संभाजी कदम, पोलिस उपायुक्त बच्चन सिंग यांच्यासह वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.

क्षत्रिय म्हणाले, पुणे पोलिस आयुक्तालयाने सेवा प्रणालीच्या माध्यमातून नागरिकांना केंद्रबिंदू मानून काम केले आहे. सेवा हक्क कायद्याचे ब्रिदवाक्य हे, 'आपली सेवा हे आमचे कर्तव्य' असे आहे. त्याचप्रमाणे सेवा प्रणालीचे काम सुरू असल्याचे ते म्हणाले. ही प्रणाली यापुढेही सुरू ठेवण्याची सूचना क्षत्रिय यांनी केली.




पोलिस आयुक्तालयातील सेवा कार्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी राज्याचे मुख्य सेवा हक्क आयुक्त स्वाधीन क्षत्रिय. समवेत पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर आयुक्त डॉ. संजय शिंदे, अशोक मोराळे आदी.

राज्यात लोक सेवा हक्क कायदा २०१५ स्थापन करण्यात आला आहे. प्रशासन हे लोकाभिमुख असले पाहिजे प्रमुख हेतू आहे. प्रशासन सेवा देत असताना नागरिकांना सेवा कालबद्ध पद्धतीने दिल्या पाहिजे. विविध कालावधीत आपल्याला सेवा न मिळाल्यास आपल्याला अपील करता येते. अर्जाची सध्या परिस्थिती काय हे पाहता आले पाहिजे. लोकाभिमुख प्रशासन हा कायद्याचा मुख्य उद्देश आहे. पारदर्शकता हा एक सेवा हक्क कायद्यामागचा उद्देश असल्याचे क्षत्रिय म्हणाले. या वेळी सेवा प्रणालीचा अनुभव काही नागरिकांनी कथन केला. तसेच, सेवा प्रणालीमध्ये कार्यरत असलेल्या महिलांसह एनएसएसच्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

सहआयुक्त रवींद्र शिसवे म्हणाले, सेवा कार्यप्रणाली ही पारदर्शकतेवर आधारित आहे. पोलिस दलात काम करीत असताना जो व्यक्ती आमच्याकडे येत आहे, त्याला आमच्याविषयी गुडविल निर्माण व्हावे, ही आमची अपेक्षा आहे. आतापर्यंत १ लाख ६६ हजार नागरिकांनी सेवा प्रणालीचा लाभ घेतल्याचे डॉ. शिसवे म्हणाले.

# Traffic safety rules handbook launched

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** In order to prevent road accidents, 'accident-free India' campaign has been launched by the Pune City Police Traffic Branch and Dhepewada Parivar, in which handbooks, leaflets and short films on traffic safety rules have been prepared.

**ROAD SAFETY CAMPAIGN**

Nitin Dhepe has created various tools for the road safety campaign and also written a 'Traffic Safety Rules Handbook'. He has also come out with information leaflets in Marathi and English.

Several banners with 25 slogans will be put up at police counselling centres and on the streets across the city.

Dhepe said the idea behind all this is that people should take initiative and create an 'accident-free India' to protect themselves and their loved ones from facing accident situation.




**INITIATIVE:** The Pune city police and Dhepewada Pariwar have come out with a booklet about various traffic rules to spread awareness.

DCP (Traffic) Prasad Akkanouru released the six-minute film and the safety rules handbook at Traffic Police Headquarters in Yerwada on Tuesday.

Police Inspector Rajesh Puranik, Inspector Mashalkar and Richa Dhepe, Ankush Raje, Jyotiba Ingle and Suraj Bandagale were also present on the occasion.

# मेवात पॅटर्न रोखण्यासाठी पोलिसांचा पुणे पॅटर्न




## फसवणूक करणाऱ्या गुन्हेगारांची पोलिसांनी बनवली कुंडली

## चालू वर्षात एक हजारापेक्षा अधिक तक्रार अर्ज दाखल

## ओएलएक्स गुन्ह्यांचे प्रमाण निम्म्याने घटले

## सायबर पोलिसांची मेवात प्रांतात दस्तक

**पुणे : प्रतिनिधी**

सध्याच्या कालावधीत जुन्या व नवीन वस्तूंची एजंटच्या मध्यस्थीशिवाय खरेदी-विक्री करण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या ऑनलाईन संकेतस्थळाचा वापर करतात. त्यामध्ये प्रामुख्याने ओएलएक्स या संकेतस्थळाचा वापर केला जातो. नेमका याच संधीचा फायदा घेत सायबर गुन्हेगारांनी ओएलएक्स या संकेतस्थळावर बोगस जाहिराती देऊन नागरिकांना आपल्या जाळ्यात वस्तू विक्री किंवा खरेदी करण्याच्या बहाण्याने खेचण्यास सुरुवात केली आहे. त्यामध्ये महिलांबरोबरच सुशिक्षित लोकांचे प्रमाण देखील मोठे आहे.

ओएलएक्स फ्रॉड करणाऱ्या टोळक्याचा बंदोबस्त करण्यासाठी सायबर पोलिसांनी गुन्ह्यांचा अभ्यास करून एक मास्टर प्लॅन तयार केला. यामध्ये सतत गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांची माहिती जमा करून त्यांची कुंडली तयार केली. त्यानंतर वारंवार गुन्हे करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या संपर्क क्रमांकांची यादी तयार करून त्यांना कायमस्वरूपी ब्लॉक केले. तसेच गुन्हेगारांनी वापरलेले पेटीएम अकाउंट, बँक खाते तत्काळ संबंधित कंपन्यांना मेसेज पाठवून फ्रिज केले. आत्तापर्यंत सायबर विभागाने ओएलएक्स आयडी १९६१ तर, त्याच्यावरून ऑपरेट होणारे मोबाईल क्रमांक २११६ ब्लॉक केले आहेत. तसेच पेटीएम खाती देखील १३०० पेक्षा अधिक बंद केली आहेत.

> ओएलएक्स फसवणुकीच्या बाबतीत आलेल्या सर्व गुन्ह्यांचे अर्ज पाहिले असता त्यामध्ये अनेक गुन्हे एकाच क्रमांकावरून केले असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर संबंधित कंपनी व बँकांना याची माहिती देऊन त्यांना कायमस्वरूपी देशपातळीवर ब्लॉक केले. यामुळे शहरातील ओएलएक्स गुन्ह्यांचे प्रमाण पन्नास टक्क्यांहून कमी झाले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे असे गुन्हे रोखण्यासाठी नागरिकांनीदेखील सजग राहण्याची गरज आहे.
>
> **संभाजी कदम,** पोलिस उपायुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे

चालू वर्षात ओएलएक्स फसवणुकीचे प्रकार एक हजारपेक्षा अधिक आहेत. मात्र पोलिसांच्या या उपक्रमामुळे पूर्वी जे दिवसाकाठी अकरा ते बारा तक्रार अर्ज दाखल होत होते त्याचे प्रमाण निम्म्यावर म्हणजेच पाच ते सहावर आले आहे.

दिवसेंदिवस ओएलएक्स फ्रॉडच्या गुन्ह्यांची व्यापकता वाढत आहे. शिवाय हे गुन्हेगार देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात बसून गुन्हेगारी कृत्य करीत असल्यामुळे त्यांचा बंदोबस्त करणे पोलिसांना देखील सहज शक्य होत नाही. शहरासह जिल्ह्यात ओएलएक्स फसवणुकीच्या घटना वाढत आहेत. एकंदर ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्ह्यांचा विचार केला तर त्यामध्ये ओएलएक्स फसवणुकीच्या गुन्ह्यांची संख्या मोठी आहे. तसेच हे सर्व फसवणुकीचे गुन्हे उत्तर भारतातील ठराविक ठिकाणाहून केल्याचे आत्तापर्यंतच्या पोलिस तपासातून समोर आले आहे. यामध्ये प्रामुख्याने राज्यस्थानमधील भरतपूर व अल्वर या जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील काही प्रमुख गावात ओएलएक्स संकेतस्थळावर खोटी जाहिरात देऊन फसवणूक करणारी रॅकेट मोठ्या संख्येने सक्रिय आहेत. त्यामध्ये एका विशिष्ट जमातीचेच तरुण सर्वाधिक सक्रिय असून, अल्पवयीन गुन्हेगारांची संख्या जास्त आहे. त्यातूनच ओएलएक्स फसवणुकीचा मेवात पॅटर्न रोखण्यासाठी आता पुणे पोलिसांच्या सायबर विभागाने पुणे पॅटर्न शोधून काढला आहे. या पॅटर्नच्या माध्यमातून सायबर गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यास पोलिसांनी सुरुवात केली आहे.

Sakal Times - 29 December, 2019

# Pune police's Zone 5 gets ISO rating for 'smart' work

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** Six police stations and divisional Assistant Commissioner of Police (AC) offices under zone 5 of Pune city police have received ISO 9001:2015 rating for their 'smart' work. Zone 5 was created during the restructuring of the Pune police commissionerate in August 2018, after some areas were included in newly formed Pimpri-Chinchwad police commissionerate.

Deputy Commissioner of Police (DCP) Prakash Gaikwad, who took over charge as first zonal DCP there, worked hard to make the police stations work smartly. He made daily visits to the police stations and the two ACP offices and ensured that complainants/visitors were treated well by cops, all personnel were in uniform, upkeep of the police stations buildings, the systematic keeping of crime records, an immediate visit to the crime scene, feedback of complainants etc.

Gaikwad, who is currently posted with CID Pune, said, "Zone 5 was newly created. I regularly visited the police stations and emphasised on important changes in work, improvement of the outlook, communication with the citizens and their well being. That got us the ISO rating. It is the result of teamwork done by all police inspectors, staffs and the two ACPs."

Assistant Commissioners of Police Milind Patil and Sunil Deshmukh were part of the team besides Mundhwa police station's Senior Police Inspector (SPI) Anil Patrudkar and Bhosale, Bibvewadi police station's SPI Ajit Lakde and Muralidhar Karpe, Market Yard police station's SPI Duryodhan Pawar and Sambhaji Nimbalkar, Kondhwa police station's SPI Milind Gaikwad and Anil Patil, Hadapsar police station's SPI Sunil Tambe and Raghunath Jadhav, Wanawadi police station's SPI Sayaji Gaware and Krantikumar Patil.

## PUNE POLICE AWARDED

The Computer Society of India has presented e-governance award to Pune City Police for their project 'Third I - Enhancing Policing, Preventing Crimes through Digital Technologies'. Earlier, Pune police were awarded two FICCI, two SKOCH, awards. Along with it, Pune police were also able to create 100 Green Corridors.

सकाळ – दि. १६ डिसेंबर, २०१९

# शाळांमध्ये 'तेऽऽज चल'



खडकी : सेंट अँथोनी हायस्कूल शाळेच्या मैदानात झालेल्या परेडमध्ये पोलिसांनी विद्यार्थ्यांना 'धिरेचल', 'तेज चल', सॅल्यूटचे प्रकार, रायफल याविषयी माहिती दिली.

**पुणे, ता. १५ :** पोलिस म्हटले की विद्यार्थ्यांच्या मनामध्ये भीती तसेच काहीसे कुतूहलही असते. मात्र पोलिस हे आपल्या सुरक्षेसाठी आहेत, हा विश्वास निर्माण करण्यासाठी तसेच पोलिसांच्या गणवेशाबद्दल आवड निर्माण व्हावी यासाठी शाळांमध्ये पोलिस परेड घेण्यात आली. त्यामुळे 'धिरेचल', 'तेज चल'च्या आवाजाने शाळांची मैदाने रोमांचित झाली. पोलिसांनी विद्यार्थ्यांना सॅल्यूटचे प्रकार, रायफल, तसेच कार्यपद्धतीविषयी माहिती दिली.

विद्यार्थ्यांमध्ये पोलिस गणवेशाबद्दल आवड निर्माण व्हावी आणि पोलिस आपल्या सुरक्षेसाठी आहेत, हा दृष्टिकोन रुजावा यासाठी पुण्यातील शाळांमध्ये शुक्रवारी सकाळी पहिल्यांदाच पोलिस परेडचे आयोजन करण्यात आले होते. लष्कर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सेंट अँथोनी हायस्कूल शाळेच्या मैदानात झालेल्या परेडमध्ये झोन दोनचे उपायुक्त शिरीष सरदेशपांडे यांनी मानवंदना स्वीकारली. या वेळी परेड कमांडर म्हणून रवींद्र रसाळ यांनी काम पाहिले. या परेडसाठी पाच वरिष्ठ निरीक्षक, उपनिरीक्षक, कर्मचारी आणि सेंट अँथोनी हायस्कूल व उत्कर्ष इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी उपस्थित होते. सरदेशपांडे यांनी या वेळी विद्यार्थ्यांना पोलिस परेडचे महत्त्व समजावून सांगितले.

खडकीतील सेंट जोसेफ गर्ल्स हायस्कूल येथील परेडमध्ये पोलिस उपायुक्त प्रसाद अक्कानवरू यांनी परेडची मानवंदना स्वीकारली.

सकाळ – दि. २३ डिसेंबर, २०१९




## फ्लॅग ऑफ

महाळुंगे-बालेवाडी : श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात रविवारी बजाज अलियांझ पुणे हाफ मॅरेथॉनच्या फ्लॅग ऑफप्रसंगी तरुण चुघ, जॅनेट चेरोबोन-बॉक्कम, के. वेंकटेशम, महापौर मुरलीधर मोहोळ, हेमंत रासने, ज्योती कलमकर, शालिनी सेठी, तपन सिंघल आदी.

TIMES OF INDIA - 18 December, 2019



Police personnel interact with students of St Anthony's School

## Cops to conduct image-building parades at taluka-level institutions

**Pune:** Police are holding parades at various schools in the city and 13 tehsils across the district to create awareness about the police force.

The city police held the first parade at St Anthony's School in the Solapur Bazaar area in Pune Cantonment limits on December 13. Deputy commissioner of police (Zone II) Shirish Sardeshpande reviewed the parade, while assistant commissioner of police Ravindra Rasal of the Lashkar division was the parade commander.

Five police inspectors, 12 police sub-inspectors and 125 police personnel, including women constables, participated in the parade. "The students were curious about several things related to the parade. Our officers and personnel answered their queries. Such interactions are required to build confidence among students and improve the image of the police force," Sardeshpande said.

Superintendent of police Sandeep Patil of the rural police told **TOI**, "The parade is being planned at a prominent school at each tehsil every month where our officers will also guide students about the career opportunities in the police force." TNN

tion and environmental issues, which shapes the behavioural pattern of the students."

The state education department has proposed setting up kitchen gardens in schools located at various locations including Ahmednagar (1,922), Chandrapur (1,165), Kolhapur (679), Mumbai (40), Nagpur (616), Nashik (1,525), Pune (1,676), Ratnagiri (1,980), Satara (1,902), Solapur (2,207), Thane (379), and Wardha (960).

सकाळ – दि. ६ डिसेंबर, २०१९

# अवैध धंद्यांची 'सफाई'

## शहरात १,९०० ठिकाणे शोधून कारवाई

पांडुरंग सरोदे : @spandurangSakal

**पुणे, ता. ५ : शहरातील अवैध धंद्यांवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी खास 'सफाई' सॉफ्टवेअरची निर्मिती करून अवैध धंद्यांविरुद्ध मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्याअंतर्गत आतापर्यंत पोलिसांनी अवैध धंदे सुरू असलेली १ हजार ९०० ठिकाणे शोधली असून, तेथील अवैध धंद्यांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.**

शहरामध्ये अवैध मद्यविक्री, मटका, जुगार अड्डे यांसह मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू आहेत. पोलिस ठाण्यांचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या आशीर्वादाने सर्व अवैध धंदे सुरू आहेत. त्यामुळे या अवैध धंद्यांवरील कारवाई केवळ वरिष्ठांना कागदोपत्री दाखविण्यासाठी करण्याचा प्रकार केला जातो. यामुळे अवैध धंदे चालविणाऱ्यांचे त्या-त्या परिसरामध्ये वर्चस्व निर्माण झाले आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रार केल्यास त्यांनाही त्रास दिला जात होता, तर सामाजिक कार्यकर्त्यांनी याबाबत तक्रार केल्यास त्यांच्या तक्रारीलाही काही अधिकाऱ्यांकडून केराची टोपली दाखविली जात होती.

या प्रकरणाची पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी गांभीर्याने दखल घेऊन अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अतिरिक्त आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे उपायुक्त बच्चन सिंग यांनी 'सफाई'द्वारे कारवाई करण्यावर भर दिला आहे. शहराच्या वेगवेगळ्या भागातील अवैध धंदे, त्यांची इत्थंभूत माहिती, चालक-मालक व्यक्ती यांच्याबाबतची माहिती गोळा करून कारवाई करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. त्यानुसार, पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात अवैध धंदे सुरू असलेली १ हजार ९०० ठिकाणे शोधली असून, त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

> शहरात अवैध धंदे सुरू असलेली १ हजार ९०० ठिकाणे शोधली असून, तेथील अवैध व्यवसायांवर कारवाई केली आहे. पुनर्तपासणीमध्ये कारवाई होऊनही अवैध धंदे सुरू असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.
>
> – अशोक मोराळे, अतिरिक्त पोलिस उपायुक्त (गुन्हे)

### 'क्रिस्प'च्या धर्तीवर 'सफाई'

शहरातील गुन्ह्यांना आळा बसण्यासाठी 'क्रिमिनल इंटेन्सिव्ह सर्व्हिलन्स प्रोजेक्टमध्ये (क्रिस्प) गुन्हेगारांवर दैनंदिन देखरेख, हालचालींवर लक्ष ठेवण्याचे काम केले जात आहे. त्या धर्तीवर 'सफाई' सॉफ्टवेअर तयार केले आहे. त्यामध्ये अवैध धंद्यावरील दैनंदिन तपासणीची माहिती दिली जाते. त्यामुळे कोणत्या भागात कुठले अवैध धंदे सुरु व बंद आहेत, याची माहिती मिळून त्यावर कारवाई केली जाते.

### ...तर पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई !

'सफाई'अंतर्गत पहिल्यांदा स्थानिक पोलिस ठाण्याचे कर्मचारी कारवाई करतात. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात गुन्हे शाखेच्या पथकाकडून पाहणी केली जाते. त्यामध्ये अवैध धंदे सुरू असल्याचे निदर्शनास आल्यास वरिष्ठांना माहिती दिली जाते. कारवाई होऊनही अवैध धंदे सुरू असल्यास संबंधित पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येते.

# अभिप्राय...

## - दर्पण विशेष अंक संदर्भात अभिप्राय –

दर्पण म्हणजे आरसा. पोलीसांनी केलेल्या चांगल्या व जनहित कारक कामाचे बाबतीत, प्रसिध्दी माध्यमाकडून नेहमीच दुर्लक्ष केले जाते. अपवादात्मक परिस्थीती वगळता पोलीसांचे लोक कल्याणकारी व चांगले कामास कधीच प्रसिध्दी दिली जात नाही. याउलट एखादया नकारात्मक बातमीस प्रभावीपणे प्रसिध्दी दिली जाते. यामुळे पोलीसांचे कार्यपध्दती बाबत जनमाणसांचे मनात नेहमीच नकारात्मक भावना निर्माण होत होती.

परंतु, मा.पोलीस आयुक्त पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाने, पुणे शहर पोलीसांकडून पोलीसांचे चांगले काम (Good work) बाबतचा दर्पण विशेष अंक प्रसिध्द होत असल्याने पोलीसांचे चांगले कामाची जनतेस आरशाप्रमाणे माहिती उपलब्ध होत असल्याने पोलीसांचे कामकाजाविषयी नागरीकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण होण्यास व पोलीसांची प्रतिमा उंचावणेस नक्कीच मदत होत आहे.

बी.ए.गायकवाड
पो.हवा.ब.नं.४५९०
येरवडा पोलीस स्टेशन पुणे.

---

दि. २३/०६/२०२३
भारती विद्यापीठ पो.स्टे
पुणे

नाव:- सुनिल यादवराव देशमाने
पो.हवा. ४४०६, भा.वि. पो.स्टे. पुणे

विषय:- पुणे शहर पोलीस दलातील दर्पण पुस्तिकेच्या अभिप्राय बाबत.

महोदय,

सन २०१८ या वर्षापासून मा. पोलीस आयुक्त सो. यांनी दर्पण पुस्तकाचा उपक्रम अविरत चालू ठेवला आहे.

या मासिकामध्ये असणाऱ्या पेपर कटींग व बातम्या या वरुन पो.ठाणे येथे येणारे पुणे नागरीक तसेच पो. अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या कार्यालयातील आपल्या सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबाबत माहिती मिळते तसेच आपण कोठेतरी चांगल्या गोष्टी करण्यास यावरुन प्रोत्साहन मिळते तसेच आपण करीत असलेल्या कामात कोठेतरी बदल करावा असे प्रत्येक पो. अधि. व कर्मचारी यांना मार्गदर्शन या पुस्तकाद्वारे मिळत आहे.

मा. सा. सादर
(S. Y. देशमाने)
HC 4406



MPSC aspirant, his friend held for finance co robbery
Bengaluru techie, wo 3 held for MBA grads
पोलिसांच्या दक्षतेमुळे मिळाली दागिन्यांची पिशवी
Ex-director of IT firm held for data robbery
अवैध धंद्यांची यादी पोलीस वेबसाइटवर जाहीर
एस्कॉर्टसाठी तरुणी पुरविणाऱ्यास अटक
दोन सोनसाखळीचोरांना अटक
olice book two for kidnap and murder of 42-year-old woman
'सेल्फी'वरून काढला आरोपींचा माग
तरुणाच्या खुनातील सहा आरोपी अटकेत
Cyber police crackdown on 2K bank accounts in Rajasthan
नववर्षाच्या स्वागतासाठी पोलीसही झाले सज्ज
हजारो अमेरिकन नागरिकांची फसवणूक; कॉल सेंटर
'उत्तम संवाद हा मुलांचे भविष्य घडविण्याचा राजमार्ग'
सराईत गुन्हेगार जाळ्यात
पोलीस दलाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी शाळांमध्ये कवायत
13,000 offenders booked for drink driving in 2019
खाकी वर्दीला डाग
जीवनाच्या स्पर्धेत यशस्वी
2 detained for questioning in MBA grad murder case
सायबर गुन्ह्यांबाबत आता विद्यालयांसाठी जागरूकता अभियान
मोबाईल अचानक बंद पडतो तेव्हा!
WHAT HAPPENED?